# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.11.2024** **वारःशनिवार**

---

1. महाराष्ट्र आणि झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार शिगेला
2. आसाममध्ये पाच जागांसाठी पोटनिवडणूक, 13 नोव्हेंबरला मतदान
3. वैद्यकीय उपकरणनिर्मिती उद्योगासाठी केंद्र सरकारची 500 कोटींची योजना
4. देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या अधिकृतपणे निवृत्त, संजीव खन्ना स्वीकारणार पदभार आणि
5. भारतीय लष्कराच्या दुसऱ्या वार्षिक वारसा महोत्सवाला नवी दिल्लीत सुरूवात

**<u>निवडणुका</u>**

महाराष्ट्र आणि झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोरात सुरू आहे. विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते त्यांच्या उमेदवारांना पाठिंबा मिळवण्यासाठी दोन्ही राज्यांमध्ये अनेक प्रचारसभा घेत आहेत. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रातील अकोला आणि नांदेड इथं जाहीर सभांना संबोधित करणार आहेत. काल मोदी यांच्या धुळे आणि नाशिक इथं, तर अमित शहा यांच्या काल सांगली जिल्ह्यातील शिराळा, सातारा जिल्ह्यात दक्षिण कराड इथं सभा झाल्या.

झारखंडमध्ये दुसऱ्या टप्प्यातील मतदान 20 नोव्हेंबरला होणार आहे, त्यामुळं तिथं प्रचार संपायला अवघे तीन दिवस उरले आहेत. झारखंडमध्ये आज केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शहा आज झारखंडच्या जमशेदपूरमधील छत्रपूर, हजारीबाग आणि पोटका विधानसभा मतदारसंघात जाहीर सभांना संबोधित करणार आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी आज धनबाद जिल्ह्यातील बागमारा विधानसभा मतदारसंघ आणि पूर्व सिंहभूम जिल्ह्यातील जमशेदपूर इथं निवडणूक सभेला उपस्थित राहणार आहेत. झारखंड मुक्ती मोर्चाचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन रांची, खरसावा आणि मंदार मतदारसंघात अनेक सभांना संबोधित करणार आहेत, तर राजद, एजेएसयू आणि डाव्या पक्षांचे नेते राज्याच्या विविध भागांमध्ये निवडणूक सभांना संबोधित करतील.

**<u>आसाम पोटनिवडणुका</u>**

आसाममध्ये 13 नोव्हेंबरला होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी पाच विधानसभा जागांवर एकूण 34 उमेदवार रिंगणात आहेत. त्यामुळं राज्यातील प्रचार शिगेला पोहोचला असून, केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल, राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अनेक मंत्री, खासदार आणि आमदार यांच्या प्रचार फेऱ्या, सभांचं नियोजन करण्यात आलं आहे. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष भूपेनकुमार बोराह आणि खासदार गौरव गोगोई हेही पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत.

**<u>नड्डा-वैद्यकीय उपकरण योजना</u>**

केंद्रीय रसायन आणि खते मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल नवी दिल्ली इथं वैद्यकीय उपकरण उद्योगाला बळकटी देण्यासाठीच्या उत्पादन निगडित प्रोत्साहन योजनेचं उद्धघाटन केलं. ही योजना देशाला वैद्यकीय उपकरण

उद्योग क्षेत्रात स्वावलंबी बनवेल आणि या क्षेत्रासाठी क्रांतीकारी ठरेल, असा विश्वास नड्डा यांनी यावेळी व्यक्त केला. ही नवी योजना 500 कोटी रुपयांची असून, यात वैद्यकीय उपकरण क्लस्टरसाठी सुविधा, क्षमता निर्माण आणि कौशल्य विकास, आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी योजना, क्लिनिकल अभ्यास कार्यक्रम आणि वैद्यकीय उपकरणांसाठी प्रोत्साहन योजना यावर भर देण्यात येणार आहे, असं सचिव अरुणिश चावला यांनी सांगितलं. ही सर्वसमावेशक योजना असून, यामध्ये या उद्योगासाठी लक्षणीय वाव असल्याचं राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<u>चंद्रचूड</u>**

देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या रविवारी अधिकृतपणे निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. अनेक ऐतिहासिक निर्णयांसाठी प्रसिद्ध असलेल्या न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयात शेवटचा दिवस होता. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या जमीन वाद, समलैंगिक व्यक्तींमधील सहमतीनं ठेवण्यात आलेल्या लैंगिक संबंधांना मान्यता आणि अविवाहित महिलांसाठी गर्भपात अधिकार यांचा समावेश आहे. त्यांचे हे निर्णय समाज आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे होते. चंद्रचूड यांनी 11 नोव्हेंबर 2022 रोजी सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला. त्यांनी सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयात कायद्याचा अभ्यास केला आणि मुंबई विद्यापीठात तुलनात्मक घटनात्मक कायद्याचे अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही काम केलं आहे. सर्वोच्च न्यायालयात 2016 मध्ये पदोन्नती झाल्यानंतर त्यांनी एक हजार 275 खंडपीठांमध्ये काम पाहिलं असल्याचं सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षकांनी म्हटलं आहे. काल आपल्या निरोपाच्या भाषणात न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी त्यांचे उत्तराधिकारी न्यायमूर्ती खन्ना यांची स्थिर आणि सक्षम नेते म्हणून प्रशंसा केली.

**<u>लष्कर वारसा महोत्सव</u>**

भारतीय लष्कराच्या दुसऱ्या वार्षिक वारसा महोत्सवाचं उद्घाटन काल नवी दिल्लीत सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्या हस्ते झालं. जागतिक आणि भारतीय थिंक टँक, व्यावसायिक, सरकारी आणि खासगी क्षेत्रे, स्वयंसेवी संस्था आणि शिक्षणतज्ज्ञ यांना एकत्रित आणून भारताची राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि लष्करी वारसा यावर लक्ष केंद्रित करण्याचा या दोन दिवसीय महोत्सवाचा उद्देश आहे. यावेळी जनरल चौहान यांनी शौर्य गाथा या प्रकल्पाचा प्रारंभ केला. शिक्षण आणि पर्यटनाच्या माध्यमातून भारताच्या लष्करी वारशाचे जतन आणि संवर्धन करणे हा याचा उद्देश आहे. यावेळी त्यांच्या हस्ते निवृत्त एअर मार्शल विक्रम सिंग यांनी लिहीलेल्या बिकॉज ऑफ दिस: अ हिस्ट्री ऑफ द इंडो-पाक एअर वॉर डिसेंबर 1971 या पुस्तकासह प्रमुख लष्करी साहित्याचं प्रकाशन करण्यात आलं. या महोत्सवानिमित्त संरक्षण संशोधन आणि विकास संघटना डीआरडीओच्या वतीनं संरक्षण संशोधनातील नवकल्पनांद्वारे आत्मनिर्भर भारतासाठी योगदान देण्यासाठीचा तिचा प्रवास आणि संधी यावर प्रकाश टाकणारे एक छायाचित्र प्रदर्शन आयोजित केलं आहे. तिन्ही सैन्य दलांमधील संधींची माहिती देणारी दालनेही या प्रदर्शनात आहेत.

**<u>गडकरी-रायपूर</u>**

देशातील रस्ते अपघात आणि त्यामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी रस्ते बांधताना रस्ता सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यावर केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भर दिला आहे. छत्तीसगडमधील रायपूर येथे इंडियन रोड काँग्रेसच्या 83 व्या वार्षिक अधिवेशनाचं काल संध्याकाळी गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर ते बोलत होते. रस्ते अभियांत्रिकी आणि वाहन अभियांत्रिकीमधील त्रुटी सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत परंतु, सदोष प्रकल्प अहवालामुळे मोठी समस्या निर्माण होत आहे. त्यामुळं प्रकल्प अहवालाची काळजीपूर्वक तपासणी केल्याशिवाय कोणतीही निविदा जारी करू नये, असंही गडकरी म्हणाले. रस्ते अभियांत्रिकीतील सुधारणा अपघातांना आळा घालेल आणि जीव वाचतील, असंही गडकरी यांनी नमूद केलं. रस्ते क्षेत्राच्या विकासासाठी एकात्मिक दृष्टिकोनावर भर देत यशस्वी जागतिक पद्धती आणि नवकल्पनांचा अवलंब करावा, असं आवाहन यावेळी

गडकरी यांनी या क्षेत्रातील अधिकारी, तज्ज्ञ आणि कंत्राटदारांना केलं. गडकरी यांनी कृषी-बहुल छत्तीसगडमध्ये बिटुमिन आणि सीएनजीचं उत्पादन करावं, अशीही सूचना केली. ते म्हणाले, या निर्णयामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होईल आणि प्रदूषणाला आळा बसेल. पायाभूत सुविधा विकसित केल्यानं औद्योगिक विकास होईल, रोजगार वाढेल, गरिबी कमी होईल आणि देश स्वावलंबी होईल, असंही गडकरी यांनी नमूद केलं. सोमवारी समारोप होणाऱ्या या चार दिवसीय अधिवेशनात दोन हजारांहून अधिक तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, अभियंते आणि अधिकारी सहभागी होत असून, रस्ते बांधणी आणि रस्ता सुरक्षा या विषयांवर चर्चा होणार आहे.

**मुंबई उच्च न्यायालय**

मुंबई उच्च न्यायालयानं विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचा हवाला देत बांधकाम कामगारांच्या नोंदणीला स्थगिती देणारं महाराष्ट्र सरकारचं परिपत्रक रद्द केलं आहे. न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसन आणि आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठानं या संदर्भातील याचिकवेरील सुनावणीवर हा निर्णय दिला. चालू असलेल्या वैधानिक बांधकामाच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा कोणताही मुद्दा आदर्श आचारसंहितेमध्ये नाही, असं खंडपीठानं म्हटलं आहे. महाराष्ट्र इमारत आणि अन्य बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाविरोधात आठ वेगवेगळ्या कामगार संघटनांनी याचिका दाखल केली आहे. बांधकामांना स्थगिती दिल्यानं कामगार कामापासून वंचित राहतात आणि विविध कल्याणकारी योजनांतर्गत मिळणारे पैसे त्यांना मिळत नाहीत, असं या याचिकेत म्हटलं आहे.

**बुद्धीबळ**

चेन्नई ग्रँड मास्टर्स क्लासिकल स्पर्धेत काल झालेल्या चौथ्या फेरीत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या अर्जुन इरिगाइसीनं इराणच्या अमीन तबताबाईचा पराभव केला. या विजयामुळं त्याला 3.5 गुणांची आघाडी मिळाली आहे. आज पाचव्या फेरीत त्याचा सामना इराणच्या परहम मगसूदलूशी होणार आहे. या स्पर्धेत विदित गुजराथी आणि अरविंद चिथंबरम यांनी प्रतिस्पर्धी मॅक्सिम लॅग्रेव्ह आणि लेव्हॉन अरोनियन यांना बरोबरीत रोखलं, तर चॅलेंजर्स विभागात प्रणव व्यंकटेशनं वैशाली रमेशबाबूचा पराभव करून सलग चौथा विजय मिळवला. ही स्पर्धा 11 नोव्हेंबरपर्यंत चालणार असून, त्यात एकूण सात फेऱ्या होणार आहेत.

**बॅडमिंटन-कोरिया मास्टर्स**

दक्षिण कोरियातील इक्सान इथं सुरू असलेल्या कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज सकाळी पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत भारताच्या किरण जॉर्जचा सामना अव्वल मानांकित थायलंडच्या विटीडसार्नशी होईल. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत जॉर्जनं पाचव्या मानांकित जपानच्या ताकुमा ओबायाशीचा पराभव केला. या स्पर्धेत भाग घेणारा जॉर्ज हा एकमेव भारतीय खेळाडू आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार